**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**मंगळवार दिनांक २५ ऑगस्ट २०२६**

**ठळक बातम्या....**

1. **बाजारातली कृत्रिम तेजी ओसरू लागल्यानं राज्यात साखरेचे भाव नियंत्रणात.**
2. **आदिवासी विभागाच्या वसतिगृहांमधल्या प्रवेशासाठी वयोमर्यादेची अट रद्द करत असल्याची आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांची घोषणा.**
3. **मराठा आरक्षणाबाबत तहसिलदारांच्या अध्यक्षते खालील वंशावळ समितीस मुदतवाढ देण्याचा शासन निर्णय जारी.**
4. **निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांची राज्याच्या लोकायुक्त संस्थेच्या अध्यक्षपदी नियुक्ती**

**आणि**

5. **नागपूर महानगरपालिकेतर्फे रक्षाबंधनानिमित्त महिला आणि १२ वर्षांखालील मुलांना २८ ऑगस्ट रोजी 'आपली बस'मधून मोफत प्रवास**

**आता सविस्तर बातम्या ......**

साखरेचे दर

राज्यात साखरेच्या दरात गेल्या तीन दिवसांत प्रतिक्विंटल १५०० रुपयांची मोठी घसरण झाली आहे. केंद्र सरकारनं साठेबाजी रोखण्यासाठी उचललेल्या कडक पावलांमुळे बाजारातली कृत्रिम तेजी ओसरू लागल्यानं साखरेचे भाव नियंत्रणात येत असल्याचं दिसून येत आहे. साखरेच्या दरात झालेली वाढ कृत्रिम होती, अशी माहिती राष्ट्रीय सहकारी कारखाना महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे यांनी दिली. घाऊक बाजारात ६७ रुपयांवर गेलेले दर खाली आले असून, किरकोळ बाजारातही प्रति किलो मागे सात रुपयांची घसरण झाली आहे. राज्यात साखरेचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती साखर संचालक डॉ. केदारी जाधव यांनी दिली.दरम्यान ,केंद्र सरकारनं शुल्कमुक्त तत्वावर आयात केलेल्या कच्च्या साखरेवर प्रक्रिया करून तिची विक्री करण्याच्या कालावधीत बदल केला आहे. यानुसार आता आयातदारांना बिल ऑफ एंट्री दाखल केल्याच्या तारखेपासून जास्तीत जास्त दोन महिन्यांच्या आत कच्च्या साखरेचं रिफाइंड साखरेत रूपांतर करून ती देशांतर्गत बाजारात विक्रीसाठी उपलब्ध करावी लागेल.

खाद्य तेल

खुले खाद्यतेल विक्रीवरून व्यापाऱ्यांमध्ये निर्माण झालेल्या संभ्रमानंतर महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने (FDA) हा नवीन निर्णय नसून २०११ पासून देशात लागू असलेल्या नियमांचीच अंमलबजावणी असल्याचे स्पष्ट केले.खाद्यतेल ग्राहकांना सीलबंद, छेडछाडरोधक व संपूर्ण लेबल असलेल्या पॅकिंगमध्येच विकणे बंधनकारक असल्याचे FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले. खुले तेलामुळे भेसळ, तेलाचा स्रोत व बॅच शोधणे तसेच दोषी उत्पादकाची जबाबदारी निश्चित करणे कठीण होते, असे FDAने स्पष्ट केले. २०२५-२६ मध्ये राज्यात खाद्यतेलाचे १,२४७ नमुने तपासण्यात आले; त्यापैकी ७७ नमुने निकृष्ट, १३ असुरक्षित आणि १५ चुकीच्या लेबलचे आढळले. याच काळात FDAने ५.३१ कोटी रुपयांचे ३,२०,७८१ किलो खाद्यतेल जप्त केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यापाऱ्यांचे व्यवसायिक नुकसान होऊ नये यासाठी भेसळ रोखण्याबाबत आदर्श मार्गदर्शक तत्व (SOP) तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

आदिवासी मंत्री उईके

आदिवासी विभागाच्या वसतिगृहांमधल्या प्रवेशासाठी वयोमर्यादेची अट रद्द करत असल्याची घोषणा राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी केली आहे. उईके यांनी आज राज्यभरातले आदिवासी समाजातले आमदार आणि खासदारांसोबत बैठक घेतली. या बैठकीनंतर बातमीदारांशी बोलतांना उईके यांनी या निर्णयाची माहिती दिली.

राज्य शासनाच्या याआधीच्या निर्णयानुसार वसतिगृहातील प्रवेशासाठी ३० वर्षे वयाच्या मर्यादेची अट होती. आता ही अट रद्द करण्याचा निर्णय या बैठकीत घेतला असल्याचं त्यांनी सांगितलं. ही अट रद्द करण्याच्या मागणीसाठी पुण्यात आदिवासी समजाच्या विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरु होतं. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्याचं आवाहन केलं होतं.

ओबीसी बैठक

जनगणनेचा दुसरा टप्पा सुरु झाला आहे. मात्र यामध्ये ओबीसी समुदायासाठी वेगळा कॉलम ठेवण्यात आलेला नाही. जातिनिहाय जनगणना व्हावी, अनुसूचित जाती आणि जमातीं प्रमाणे ओबीसीसाठी स्वतंत्र कॉलम असावा या मागणीसाठी, सकल ओबीसी समाज तर्फे राज्यस्तरीय ओबीसी संघटनांची बैठक आज मुंबईत पार पडली.

मुदतवाढ

कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी वंशावळ जुळवण्याची कार्यवाही करण्यासाठी तालुकास्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखालील समित्यांना मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. वंशावळ जुळवण्यासाठी नेमण्यात आलेल्या तहसीलदारांच्या या समित्यांना १ जुलै २०२६ ते ३० जून २०२७ या एक वर्षाच्या कालावधीपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला असून सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागानं आज या संदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये वंशावळी जुळवण्याचे कामकाज अद्याप पूर्ण न झाल्यानं या समित्यांना मुदतवाढ देण्याचे निर्देश मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीने दिले होते. त्यानुसार वंशावळ जुळविण्यासाठीच्या तालुकास्तरावरील समित्यांना मुदतवाढ देण्यात आल्याचं या शासन निर्णयात नमूद करण्यात आलं आहे.

सुनील शुक्रे

निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांची राज्याच्या लोकायुक्त संस्थेच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी आज त्यांना पदाची शपथ दिली. मुंबईत लोकभवनात झालेल्या या शपथविधी सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. न्यायमूर्ती शुक्रे यांनी पुणे विद्यापीठातून आपलं पदवीपर्यंतचं शिक्षण आणि त्यानंतर अमरावती इथल्या डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयातून एलएलबीचं शिक्षण पूर्ण केलं होतं. नागपूर विद्यापीठातून त्यांनी घटनात्मक कायदा या विषयात विधी शिक्षणाची पदव्यूत्तर पदवी प्राप्त केली होती.

मोफत प्रवास

रक्षाबंधनाच्या निमित्ताने नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाने महिलांसह १२ वर्षांखालील मुलांना २८ ऑगस्ट रोजी दिवसभर आपली बसमधून मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. कुटुंबीयांना भेटण्यासाठी प्रवास सुलभ व्हावा आणि

सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

'खेलो इंडिया संवाद - युवा कनेक्ट'

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त 'खेलो इंडिया संवाद - युवा कनेक्ट' कार्यक्रम २७ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता अकोल्याच्या शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात आयोजित करण्यात आला आहे. नागपूरातील लेडी अमृत बाई डागा - एलईडी महाविद्यालयात देखील या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी आभासी माध्यमातून युवकांशी संवाद साधणार आहे. देशभरातील १,६०० ठिकाणांहून ८ लाखांहून अधिक युवक यात सहभागी होणार आहेत.

मंत्री पंकज भोयर

वर्धा येथे प्रस्तावित न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि प्रशिक्षण केंद्र देशातील आदर्श केंद्र ठरावे, तसेच इतर राज्यांमधूनही प्रकरणे तपासणीसाठी या केंद्राकडे येतील, अशा पद्धतीने त्याची क्षमता विकसित करावी, असे निर्देश राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले. या संदर्भात झालेल्या बैठकीत केंद्राचे अंतिम सादरीकरण अधिक परिपूर्ण करून आवश्यक बदल तातडीने करावेत, असंही त्यांनी सांगितलं, दरम्यान राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र वर्धा याबाबतही बैठकीत चर्चा झाली हे केंद्र वर्धा येथे तीनशे एकर जागेवर दोन हजार प्रशिक्षणार्थी क्षमतेचा राहणार आहे.

हवामान

प्रादेशिक हवामान केंद्राने जारी केलेल्या इशाऱ्या नुसार आगामी काही तासांत नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांतील तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस होण्याची शक्यता आहे.

डागा रुग्णायालय

नागपूरमधील प्रसिद्ध डागा रुग्णालयातून नवजात बालकाचे अपहरण झाल्याची धक्कादायक घटना समोर आल्यानंतर या घटनेच्या निषेधार्थ युवक काँग्रेसच्या वतीने

आज रुग्णालयाबाहेर आंदोलन करण्यात आलं. यावेळी कार्यकर्त्यांनी रुग्णालयाच्या निष्काळजीपणा विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. तहसील पोलिसांनी तातडीने कारवाई करत अपहृत बाळाचा शोध लावून आरोपीला अटक केली असली, तरी रुग्णालयातील सुरक्षेचा प्रश्न अजूनही कायम आहे त्याबाबत युवक काँग्रेसच्या शिष्टमंडळाने डागा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांची भेट घेऊन निवेदन सादर केलं. रुग्णालयातील बंद पडलेले सीसीटीव्ही कॅमेरे, सुरक्षा रक्षक आणि सुरक्षेवर होणाऱ्या निधीच्या वापरावर प्रशासनाला जाब विचारण्यात आला. येत्या १५ दिवसांत रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्था बळकट करून योग्य कारवाई न झाल्यास अधिक उग्र आंदोलन छेडण्याचा इशाराही प्रशासनाला देण्यात आला आहे.

सैनिकांसाठी राख्या

देशाच्या सीमेवर अहोरात्र खडतर पहारा देऊन देशवासियांचे रक्षण करणाऱ्या भारतीय सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील सुरज देवी रामचंद्र मोहता महिला महाविद्यालयाने एक अत्यंत प्रेरणादायी उपक्रम राबवला आहे. महाविद्यालयाच्या 'राष्ट्रीय सेवा योजने' च्या वतीने "एक धागा सैनिकांच्या, देशाच्या नावाने" या विशेष मोहिमे अंतर्गत शेकडो विद्यार्थिनींनी स्वतः तयार केलेल्या राख्या भारतीय डाक विभागामार्फत सीमेवरील जवानांकडे आज रवाना केल्या.

प्रतिभा धानोरकर

वरोरा शहरालगतच्या वेकोलिच्या एकोना कोळसा खाणीत होणाऱ्या तीव्र ब्लास्टिंगमुळे घरांना तडे जाणे, प्लास्टर पडणे आणि खिडक्यांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारींची खासदार प्रतिभा धानोरकर यांनी गंभीर दखल घेतली. याप्रकरणी उपविभागीय अधिकारी कार्यालयात झालेल्या संयुक्त बैठकीत येत्या १५ दिवसांत वरोरा शहरातील ४ ते ५ वॉर्डांत पॅरामीटर्स बसवून ब्लास्टिंगच्या कंपनांची आणि तीव्रतेची तपासणी करण्याचे आश्वासन वेकोलि प्रशासनाने दिले आहे . बाधित घरांचे स्ट्रक्चरल ऑडिट तसेच जिल्हाधिकाऱ्यांमार्फत तांत्रिक चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

********